# उपोद्घात

भारतीय अर्थव्यवस्था शेतीप्रधान व ग्रामीण अर्थव्यवस्था आहे. भारतीय अर्थव्यवस्था विकसित होत असली तरी एकीकडे मुठभर लोकांचे भरमसाठ उत्पन्न वाढत आहे. तर दुसरीकडे बहुसंख्य लोकाना आपल्या दैनंदिन व जीवनावश्यक गरजा भागविणे अवघड जात आहे. समाजात गरीब व श्रीमंत यांच्यातील दरी दिवसे-दिवस वाढत आहे. ग्रामीण दारिद्र्याचा प्रश्न गंभीर आणि आर्थिक विकासाला खीळ घालणारा आहे. म्हणून आर्थिक व सामाजिक दृष्टीने दारिद्र्य रेषेखालील लोकांच्या उत्पन्नात-वाढ व राहणीमानात सुधारणा व्हावी यासाठी शासनाने दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमांतर्गत अनेक योजना राबविल्या आहेत. दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमाची उद्दिष्टे अंमलबजावणी, यशस्विता अभ्यासण्यासाठी एक प्राति-निधिक घटक म्हणून आटपाडी तालुक्याची निवड केली.

मी आटपाडी तालुक्यातील विठलापूर गावचा स्थायी रहिवासी आहे व माझे जन्मगाव तेच आहे तसेच माझे पदवीपर्यंतचे शिक्षण आटपाडी येथेच पूर्ण केले आहे. त्यामुळे तालुक्यातील लोकांच्या राहणीमानाचा, उत्पन्नाचा व्यवसायाचा, गरिबीचा मला लहानपणापासून अनुभव आहे. तेथील जनसामान्यांचे व तेथील मातीचे ऋण फेडण्याचा प्रयत्न या योगे केला आहे. सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुका दुष्काळग्रस्त व विकासापासून वंचित राहिला तालुका असून दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम कितपत यशस्वी झाले आहेत हे पाहण्यासाठी आटपाडी तालुक्यातील दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम अभ्यासासाठी निवडला.

या योगे आटपाडी तालुक्यातील दारिद्र्य रेषेखालील लाभार्थींची लाभ मिळण्यापूर्वीची व नंतरची आर्थिक व सामाजिक स्थिती आणि दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमांतर्गत लाभार्थींना मिळालेले लाभ, तसेच कार्यक्रमांची यशस्वीता

वादविषयासाठी सूचना या बाबींचा अभ्यास केला आहे. सदर तालुक्यातील कार्यक्रमांच्या अंमलबजावणी व यशस्वीता व दोष या संबंधीची सध परिस्थिती यांचे चित्र डोळ्यासमोर आणून देण्याचा हा एक प्रयत्न आहे. हा अभ्यास परिपूर्ण व अखेरचा आहे असे मी मानीत नाही.

हा अभ्यास करण्याची संधी मला मिळाल्याने गरीब लोकांच्या अडी-अडचणी व राहणीमान मला प्रत्यक्ष जवळून अभ्यासावयास मिळाले व त्यांच्या अडचणी मांडावयाची संधी मला मिळाली यातच मला आनंद आहे. आज हे काम पूर्ण होत असल्याने मला सात्विक समाधान होत आहे.

......

# कृ त ज्ञ ता

हा प्रबंध माझ्या आई-वडिलांच्या आशिर्वादाचे व गुरुवर्यांच्या प्रेरणेचे मूर्तरुप आहे. या निमित्त मी अंत:करणाची भावना व्यक्त करण्याचे एक माध्यम म्हणून आभार प्रदर्शनाचा स्विकार करणार आहे. कोणतेही चांगले कार्य करावयाचे असल्यास त्याला सहकार्याची जोड आवश्यक असते. सहकार्याशिवाय कोणतीही वाटचाल पूर्ण होत नाही. मला शोध प्रबंध पूर्ण करण्यासाठी ज्यांचे ज्यांचे सहकार्य लाभले त्या सर्वांचा मी ऋणी आहे ते व्यक्त करण्याचा हा प्रामाणिक प्रयत्न.

या कामी माझे संशोधन मार्गदर्शक डॉ. सुरेंद्र गो. भानुशाली व्यवसाय अर्थशास्त्र विभाग प्रमुख, दे.भ.र.कुं. वाणिज्य महाविद्यालय, कोल्हापूर यांनी माझ्यावर कृपाकटाक्ष ठेवला, त्यांचे मार्गदर्शन, त्यांची प्रेरणा, जिव्हाळा माझ्या कामात सतत चैतन्य देणारा राहिला. त्यांनी माझ्यासाठी दिलेला बहुमुल्य वेळ व वेळोवेळी केलेल्या महत्त्वपूर्ण सूचना यामुळेच प्रबंधपूर्ण होऊ शकला. त्यांच्या प्रेमळ, जिव्हाळयाच्या मौलिक व व्यासंगी मार्गदर्शनाचा मला अतिशय लाभ झाला.

प्रस्तुत प्रबंध लेखनाचे काम विविध अवस्थामधून जात असताना मला अनेकांचे हार्दिक सहकार्य लाभलेले आहे. विशेषत: प्रबंधाच्या सामग्रीच्या संदर्भात आटपाडी तालुक्यातील पाच खेड्याचे सर्वेक्षण करताना जवळीक, सहकार्य व दिलासा देणारी माणसे मला सर्व ठिकाणी मिळालेली आहेत. त्या सर्वांच्या सहकार्याबद्दल मी अंत:करणपूर्वक आभार मानत आहे.

प्रस्तुत प्रबंधासाठी डॉ.व्ही.बी. घुगे, अर्थशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, त्याचबरोबर डॉ. आर.आर. दोशी, डॉ. जे.एफ. पाटील, डॉ. टी.जी. नाईक, श्री. ए.ए. डांगे, श्री.आर.जी.दंडगे आदी विभूतींचे प्रेरणा व सहकार्य लाभले त्यामुळे त्यांच्या ऋणात राहणे मी माझे भाग्य समजतो.

श्री.व्ही.एस्. गेजगे व आर. पी. मोहिते विस्तार अधिकारी व सांख्यिकी विभाग प्रमुख एकात्मिक ग्रामीण विकास योजना व इतर दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम पंचायत समिती आटपाडी, प्रशासन विभाग प्रमुख श्री कांबळे पंचायत समिती आटपाडी गटविकास अधिकारी, विठ्लापूर, करगणी, माडगुळे, लिंगीवरे व खरसुंडी या गावातील ग्रामपंचायत सरपंच, ग्रामसेवक व इतर कर्मचारीवर्गाच्या सहकार्याशिवाय माझा अभ्यास विस्तारितपणे मांडू शकलो नसतो.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील ग्रंथपाल व कर्मचारी, आटपाडी महाविद्यालय (आटपाडी) येथील प्राचार्य, ग्रंथपाल, तसेच श्री. अब्दूल, श्री अशिझा काझी ह्या वयोवृध्द ग्रहस्थानी माझ्या कार्यास लागणारी अत्यंत मौलिक पुस्तके, नकाशे तत्परतेने पुरविली, त्यांचे ही आभार.

आटपाडी महाविद्यालयातील प्रा. बी.सी. सोमवंशी, प्रा.जे.बी.मुलाणी प्रा. अहिरे. डी.बी, प्रा. व्ही.बी. जाधव तसेच येथील इतर प्राध्यापकांनी प्रबंध लिखाणास वेळोवेळी प्रोत्साहन दिले. तसेच वडिल बंधू व गुरुवर्य प्रा. एम्.के. बाड सर, महिला महाविद्यालय उंब्रज येथील प्रा.भोसले एस्.एम्., विद्यार्थी भवनचे अध्यक्ष डॉ. विजय सावंत तसेच किसान टायर्स (कोल्हापूर)चे मालक महादेव बाड, पी.ए.सावंत (काका) यांचे मोलाचे सहकार्य व प्रेरणा मिळाली तसेच ज्या मित्रांनी माझ्या कामात मदत केली त्या सर्वांचे ऋण मनी आहेच.

सरते शेवटी माझा लहान भाऊ धनंजय बाड याने एम्.फिल्. कोर्स पूर्ण करण्याची सुवर्णसंधी दिली त्याच्या आभाराशिवाय हा ऋणनिर्देश अपूर्णच वाटत होता. त्याचेही आभार मानतो.

या खेरीज जाणता अजाणता सहाय्यभूत झालेल्यांचे परंतु नामनिर्देश करता आला नाही अशांचेही हार्दिक आभार मानीत आहे.

(श्री.डी.आर.बाड)

कोल्हापूर.

.....